# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २०९ वा शनिवार दि.२० जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# कोट्यवधींचा खर्च, पण गुंतवणूक शून्य.डोंगर, झाडी बघायला दावोसला गेला होता का ?

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षी दावोस दौ-यावर चाळीस खोक्यांचा खर्च केला होता, पण त्यातून काही निष्पन्न झालेले नाही. आत्ताही ५० लोकांचे शिष्टमंडळ घेऊन दावोसला गेले होते, किती गुंतवणूक आणली ? व्हायब्रंट गुजरात मध्ये २६ लाख कोटींची गुंतवणूक आली. तामिळनाडूने सहा लाख कोटींची गुंतवणूक आणली महाराष्ट्राला काय मिळाले ? असा सवाल करत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या दौ-यावर आज जोरदार टीका केली.दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषदेत ३ लाख ५३ हजार कोटींचे सामंज्य करार झाले असून, दीड लाखांपेक्षा जास्त एमओयूला स्वीकृती मिळाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. परंतु ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मात्र याबाबत शंका व्यक्त करताना दौ-यावर जोरदार टीका केली. घटनाबा मुख्यमंत्री परदेशी दौरा करून परतले आहेत, मागच्या वर्षीच्या तुलनेत परदेशी दौ-यावर यंदा खूप मोठा खर्च झालेला आहे आणि काम शून्य झालेलं आहे. कारण त्यांची कार्यक्षमताच नाही आहे. जे करार केले त्यातील काही करार आधीच झाले होते. पण त्याचे पुढे काहीही झाले नाही. चंद्रपूर येथे वीस हजार कोटींचा प्रकल्प येणार होता, पण त्याचं पुढे काय झालं हे माहित नाही.परदेशी डेटा सेंटर कंपनी बारा हजार कोटींची गुंतवणूक करणार होती, हँड्स इन्फ्रा चार हजार कोटी, रत्नागिरीत बारा हजार कोटींचा प्रकल्प येणार होता, आणखी एक सोळाशे कोटींचा प्रकल्प येणार होता, पण त्याचे पुढे काय झाले कोणालाच माहित नाही. फोटो दाखवणे, व्हाईट पेपर, ब्लॅक पेपरकिंवा वेगवेगळ्या रंगाचे पेपर नको. प्रकल्पाचे काम कुठपर्यंत पोहचले आहे हे तुम्हाला दाखवावे लागले,असे आदित्य ठाकरे म्हणाले. वेदांतासारखा प्रकल्प राज्यातून बाहेर गेला तेव्हा यापेक्षा मोठा प्रकल्प आणू असे सांगितले गेले. पण अजून कोणताही प्रकल्प आलेला नसल्याची टीका त्यांनी केली.मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौ-यावर ५० लोक सोबत होते. मी टीका केल्यावर अनेक लोक स्वखर्चाने जाणार असल्याचे सांगितले. स्वखर्चाने दावोसला जाणारे कोणकोण आहेत, त्यांनी परराष्ट्र खात्यांची परवानगी घेतली होती का? दावोसला जाऊन त्यांनी काय केले हे सरकारने जाहीर करावे, अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली. तेथे जाऊन बर्फात खेळण्यासाठी गेला होता, की तिथले डोंगर आणि झाडी बघायची होती ? असा बोचरा सवाल त्यांनी केला.



# रेणापूरच्या पुरातन श्रीराम मंदिर विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही - आ. रमेशअप्पा कराड

लातूर :- प्रदिर्घ संघर्षानंतर आयोध्येत प्रभू श्रीराम यांच्या भव्य दिव्य मंदिराचे करोडो भाविकांचे स्वप्न देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या कल्पनेतून साकार होत आहे. यानिमित्ताने देशभर आनंद उत्सव साजरा केला जात असून रेणापूर येथील पुरातन काळातील प्रभू श्रीराम मंदिराच्या सर्वांगिन विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

आयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरात २२ जानेवारी रोजी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना होत असल्याने देशभर आनंद उत्सव साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून रेणापूर येथील पुरातन काळातील प्रभू श्रीराम मंदिर आहे या मंदिरात १८ ते २२ जानेवारी दरम्यान होम हवन, भजन, राम नाम जप पालखी सोहळा, सार्वजनिक महाआरती आणि महाप्रसाद विविध कार्यक्रम होत आहेत.

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर येथील पुरातन काळातील प्रभू श्रीराम मंदिरात आनंद उत्सव सोहळा सुरू असून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या आनंद सोहळ्यात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि खा. सुधाकर शृंगारे यांनी शुक्रवारी सकाळी सहभागी होऊन महापूजा व आरती केली. यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, ॲड. दशरथ सरवदे, वसंत करमुडे, अभिषेक आकनगिरे, सतीश आंबेकर, नवनाथ भोसले, सुकेश भंडारे, डॉ. बाबासाहेब घुले, भागवत गीते, बालाजी वैष्णव, बब्रुवान येलमटे, शिवाजी आकनगिरे, नामदेव साबदे, गणपत दरोडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, रेणापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आतापर्यंत कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिल्याने मोठ्या प्रमाणात विकासाची कामे झाली आहेत. शहराचा चेहरा आणि मोहरा बदलून गेला आहे. पुरातन काळातील श्रीराम मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे सांगून ७५ लक्ष रुपयाचा प्रस्ताव लवकरच मंजूर होईल असे बोलून दाखवले. श्रीराम मंदिर आणि रेणापूर शहराच्या विकास कामात जिथे जिथे माजी मदत लागेल तिथे निश्चितपणे मदत केली जाईल आपण सर्वांनी मला आशीर्वाद दिला आहे या पुढील काळातही आशीर्वाद द्यावेत अशी अपेक्षा खा. सुधाकर शृंगारे यांनी व्यक्त केली. श्रीराम मंदिरास आमदार निधीतून सभागृह दिल्याबद्दल आणि भविष्यातील विकास कामाला मोठी मदत केल्याबद्दल अभिषेक आकनगिरे, धनंजय खंदाडे, शांतिवीर शिरसागर, सुधीर भातिकीरे, सुरज आकनगीरे, बालाजी वैष्णव यांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला तर खा. सुधाकर शृंगारे यांचा भाजपाच्या वतीने शहराध्यक्ष अच्युत कातळे, भाजयुमो शहराध्यक्ष संतोष राठोड यांनी स्वागत केले.

यावेळी पुनमदास वैष्णव, भागवत खंदाडे, श्रीकृष्ण मोटेगावकर, चंद्रकांत कातळे, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, उत्तम चव्हाण, श्रीकृष्ण पवार, प्रशांत ईगे, नागुबाई आलापुरे, शीला आचार्य, अनुसया फड, उमा सूर्यवंशी, पवन आकनगिरे, गणेश माळेगावकर, राजू अत्तार, शेख अजीम, उज्वल कांबळे, रमाकांत चव्हाण, गणेश चव्हाण, मारुती गालफाडे, रोहित खुमशे, नागेश बसतापुरे, ईश्वर बद्दर, श्रीमंत नागरगोजे, धम्मानंद घोडके, सचिन शिरसकर, नंदू बंडे, रफिक शिकलकर, हुसेन पठाण, दत्ता उगिले, दिलीप चव्हाण, हनुमंत भालेराव, अंतराम चव्हाण, बाबुराव कस्तुरे, बालाजी अकनगिरे, अंगद आलापुरे, दत्ता बाळे, पप्पू कुडके, सिद्दिलिंग उडगे, अजय मरलापल्ले, राजकुमार वैष्णव, सुरज फुलारी , नरसिंग शेंदरकर, नारायण राठोड, नितीन क्षिरसागर, मनोज चक्रे, नंदू मोठेगावकर, राजू सूळ, बळी आलापुरे, शरद जाधव यांच्यासह भाविक भक्त, महिला, पुरुष भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.








# आ.रमेशआप्पा कराड, खा.शृंगारे यांच्याकडून रेणापूरातील श्री रेणुका देवी मंदिरात स्वच्छता

लातूर :- देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या संकल्पनेतील स्वच्छ भारत अभियान अंतर्गत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि खा. सुधाकर शृंगारे यांनी १९ जानेवारी शुक्रवार रोजी रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिराची स्वच्छता केली यावेळी भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते.

आयोध्या नगरीत प्रदीर्घ संघर्षानंतर बांधण्यात येत असलेल्या भव्य दिव्य प्रभू श्रीराम मंदिरात येत्या २२ जानेवारी रोजी राम लल्ला मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सोहळा होत आहे. यानिमित्ताने देशभरातील मंदिरात स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम राबवावी अशी संकल्पना पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी मांडली त्यानुसार भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि खा. सुधाकर शृंगारे यांनी असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिशक्ती श्री रेणुका देवी मंदिर येथे शुक्रवारी सकाळी मंदिराचा गाभारा, सभामंडप पाण्याने स्वच्छ धुण्यात आला आणि परिसरातील संपूर्ण स्वच्छता करण्यात आली.



रेणुका देवी मंदिर स्वच्छता अभियान कार्यक्रमात भाजपाचे विक्रमकाका शिंदे, ॲड. दशरथ सरवदे, वसंत करमुडे, अभिषेक आकनगिरे, सतीश आंबेकर, नवनाथ भोसले, सुकेश भंडारे, डॉ. बाबासाहेब घुले, भागवत गीते, श्रीकृष्ण मोटेगावकर, चंद्रकांत कातळे, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, उत्तम चव्हाण, श्रीकृष्ण पवार, शीला आचार्य, अनुसया फड, गणेश माळेगावकर, राजू अत्तार, शेख अजीम, उज्वल कांबळे, रमाकांत चव्हाण, मारुती गालफाडे, गणेश चव्हाण, रोहित खुमशे, नागेश बसतापुरे, श्रीमंत नागरगोजे, धम्मानंद घोडके, सचिन शिरसकर, नंदू बंडे, रफिक शिकलकर, हुसेन पठाण, दत्ता उगिले, दिलीप चव्हाण, हनुमंत भालेराव, अंतराम चव्हाण, बाबुराव कस्तुरे, पप्पू कुडके, अजय मरलापल्ले, भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वप्रथम आ. कराड आणि खा. शृंगारे यांनी श्री रेणुका मातेची आरती करून दर्शन घेतले. स्वच्छता कार्यानंतर रेणुका देवी मंदिर ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष राम पाटील, गुरसिध्दअप्पा उटगे, दिलीप आकनगिरे यांनी रेणुका मातेची प्रतिमा भेट देऊन यथोचित सत्कार केला.

# राजर्षी शाहू महाविद्यालयात जागतिक गर्भाशय मुखाचा कर्करोग जागरूकता कार्यशाळेचे उद्घाटन

लातूर- येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात येणार व्हील क्लब व स्पेक्ट्रम फाउंडेशन आणि शाहू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक गर्भाशय मुखाचा कर्करोग जागरूकते विषयांवर एक दिवशी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिद्धकॅन्सर तज्ज्ञ डॉ .प्रियंका राठोड, एम जे हॉस्पिटल, लातूर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे तर व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे ,प्रा. सोमदेव शिंदे, इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा श्रीमती आरोही बुलानी हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. प्रियंका राठोड यांनी गर्भाशय मुखाच्या कर्करोग संदर्भात मार्गदर्शन केले त्या म्हणाल्या की, भारतीय स्त्रियांमध्ये हा आजार अतिशय मोठ्या प्रमाणात आढळत असून लाखो नवीन रुग्ण दिसून येतात या सर्व रोगाची कारण मीमांसा करताना त्यांनी स्त्रियांमधील वैयक्तिक अस्वच्छता लहान वयात होणारी विवाह गर्भनिरोधक गोळ्यांचे अधिक सेवन अशा विविध कारणे हा आजार बळावू शकतो त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे जरुरीचे असते. त्यावर सहज उपचार उपलब्ध आहेत तत्पूर्वी प्रत्येक स्त्रीने अशा आजाराबद्दल सातत्याने जागृत असणे अत्यावश्यक आहे, याचे भान कॅन्सर तज्ज्ञ डॉ .प्रियंका राठोड यांनी याप्रसंगी करून दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती फेरे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी प्रास्ताविक पर भाषणात स्त्रिया मधील होणाऱ्या स्तन अधिक कर्करोगाविषयी व गर्भाशय मुखाच्या कॅन्सरासाठीच्या प्रतिबंधात्मक लसीकरणासंदर्भात माहिती दिली.

या उद्घाटन पर कार्यक्रमानंतर लगेचच स्त्रियांच्या वेगवेगळ्या मोफत वैद्यकीय तपासण्या केल्या यामद्धे पॅप स्मिअर टेस्ट प्रामुख्याने करण्यात आली त्यासाठी स्त्रिया कडून उत्तम प्रतिसाद मिळाला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.श्रद्धा जोशी यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अनिरुद्ध बिराजदार ,प्रा. प्रकाश रोडिया,श्री गोविंद जाधव आदींनी परिश्रम घेतले.






दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# अस्वस्थ 'अर्थ'चित्रे

कोव्हिड साथरोगानंतर अजूनही उभारी घेऊ न शकलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांच्या पार्श्वभूमीवर दावोस येथे 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'ची ५४ वी परिषद सुरू असतानाच, प्रसिद्ध झालेल्या दोन अहवालांतून या आव्हानांची कारणे आणि त्यांची तीव्रता समोर येते. पहिला अहवाल आहे, तो भविष्यातील विकासाचा वेध घेणारा. 'फ्युचर ऑफ ग्रोथ रिपोर्ट २०२४' या नावाने तो प्रसिद्ध झाला आहे. दुसरा अहवाल आहे, तो जगातील वाढत्या विषमतेवर बोट ठेवणारा; 'ऑक्सफॅम इंटरनॅशनल' या संस्थेने प्रसिद्ध केलेला.या दोन्ही अहवालांचा स्वतंत्रपणे विचार केल्यास दोन वेगवेगळी 'अर्थ'चित्रे समोर येतात. मात्र, एकत्रित विचार केल्यास आर्थिक वृद्धीचा मंदावत चाललेला दर आणि वाढत चाललेली विषमता यांमुळे निर्माण होणारे संभाव्य धोके समोर येतात. त्यामुळे एकत्रित विचार करून धोके टाळण्यासाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मात्र, पूर्तता होण्याची शक्यता कमीच दिसते; कारण तसे असते तर विषमतेची दरी दिवसागणिक रुंदावलीच नसती. तरी-ही चर्चा व्हायला हवीच. जागतिक अर्थव्यवस्था गर्तेत सापडली असून, आर्थिक वृद्धीचा दर आणखी खाला-वणार असल्याची भीती पहिल्या अहवालाने व्यक्त केली आहे. १०७ देशांच्या अर्थव्यवस्थांचा आढावा घेऊन तयार करण्यात आलेल्या या अहवालाने रेखाटलेले चित्र फारसे आशादायक नाही. जगभरात निर्माण झा-लेली भूराजकीय स्थिती, कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या (एआय) नवतंत्रज्ञानाचा रोजगार निर्मितीवर होण-ारा विपरीत परिणाम, पर्यावरणाचे ढासळत चाललेले संतुलन आणि त्यामुळे वाढत चाललेल्या नैसर्गिक आपत्ती, मंदी-महागाई यांमुळे प्रक्षुब्ध होत चाललेले सामान्यजन या साऱ्यांचा फटका अर्थव्यवस्थेला बसत आहे. परिणामी, येत्या सहा वर्षांत जागतिक आर्थिक वाढीचा दर गेल्या तीन दशकांतील नीचांकी पातळी-वर जाईल, अशी भीती आहे.ही झाली भविष्यातील भीती; प्रत्यक्षातील भीती आहे, ती वाढत्या विषमतेची. जगातील एकूण संपत्तीपैकी तब्बल ४३ टक्के संपत्ती केवळ एक टक्का श्रीमंतांकडे एकवटली आहे. जगा-तील पाच अतिश्रीमंतांच्या संपत्तीत गेल्या चार वर्षांत ११४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२०पासून त्यांच्या एकत्रित संपत्तीत दर तासाला तब्बल १४ लाख डॉलरची भर पडत गेली. या उलट पाच अब्ज लोकांचा म्हणजेच जगातील निम्म्याहून अधिक लोकसंख्येचा खिसा याच कालावधीत रिकामा झाला आहे. सुमारे ८० कोटी लोक दारिद्र्यात फेकले गेले आहेत. येत्या दशकभरात जगातील पहिल्या ट्रिलियनेरचा म्हणजेच ज्यांच्याकडील संपत्ती एक लाख कोटी डॉलरहून अधिक आहे अशा व्यक्तीचा उदय होईल; मात्र जगा-तील गरिबी दूर करण्यासाठी आणखी तब्बल २२९ वर्षे लागतील, असा 'ऑक्सफॅम'चा अंदाज आहे. जगातील दारिद्र्य दूर करणे हे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांपैकीचे एक असून, त्यासाठी २०३०पर्यंतची मुदत होती. या मुदतीत गरिबी दूर होण्याची कल्पनाही करणे शक्य नाही. संपत्तीच्या इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेले केंद्रीकरण मानवतेच्या विरोधात आहे. मात्र, गर्भश्रीमंतांकडेच बड्या कॉर्पोरेट कंपन्यांची सूत्रे असून, या कंपन्यांनी कमावलेल्या नफ्यातील सिंहाचा वाटा त्यांच्याकडेच जातो. या गर्भश्रीमंतांचे राजकारण्यांशी अतिशय जवळचे नाते असते. किंबहुना आपल्याला हवा तोच नेता सत्तेवर येईल यासाठी ते कारस्थाने करीत असतात. अमेरिकेसह अनेक प्रगत आणि विकसनशील देश याला अपवाद नाहीत. भारतातही श्रीमंतीचे कमालीचे केंद्रीकरण आहे. एकीकडे देशातील अब्जाधीशांची संख्या वाढते आहे आणि दुसरीकडे सुमारे ८० कोटी जनतेला मोफत धान्य पुरविले जात आहे. हा विरोधाभास देशातील विषमता अधोरेखित करणाराच आहे.अर्थव्यवस्थेची मंदावलेली गती आणि विषमतेचा वाढत चाललेला वेग या दोन्ही समस्या गंभीर आहेत. त्यात भर पडली आहे, ती हवामानातील बदलांची. चक्रीवादळे, महापूर आणि दुष्काळ या समस्या आता नित्याच्या बनल्या आहेत. त्यांमधील जीवितहानी कमी करण्यात मानवाला यश येत असले, तरी आर्थिक फटका काही कमी झालेला नाही. महापुरासारख्या आपत्तीने देशाची अर्थव्यवस्था कोलमडून पडण्याची उदाहरणे वाढत आहेत. दुसरीकडे 'एआय'मुळे सध्या प्रचलित असलेल्या अनेक रोजगारांवर गदा येण्याची भीती आहे. यामुळे बेरोजगार तरुणांच्या फौजा वाढतील आणि संकट आणखी तीव्र होईल. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी साकल्याने विचार व्हायला हवा. दावोसमधील परिषदेत तो होईलही; परंतु या परिषदेत किती करारमदार झाले यावरील चर्चांवर लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे अस्वस्थ करणाऱ्या 'अर्थ'चित्रांवरील उपायांच्या चर्चेकडे दुर्लक्ष होण्याचा धोका आहे. मानवकेंद्री, पर्यावरणपूरक विकास आणि गर्भश्रीमंतांची हाव संकुचित करणे यातून या सर्व संकटांवर मात करता येईल.

# अधिकारी कर्मचारी आणि राजकीय नेतेच जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर?

अधिकारी कर्मचारी आणि राजकीय नेतेच जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर ते राज्यघटना,संविधानाची अंमलबजावणी होऊ देणार नाहीत.यांचा अनुभव आता शेतकरी,कामगार,सेवानिवृत सैनिक,सुशिक्षित तरुण,बेरोजगार तरुण,जिल्हा परिषद शिक्षक,विना अनुदानीत बी एड,झालेले शिक्षक,आरोग्य सेवा देणारे डॉक्टर,कामगार,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर,क्रीडा क्षेत्रातील खेळाडू सर्वानीच भारतीय नागरिक म्हणून अनुभव घेतला असेल यात शंका नाही.त्यामुळे महागाई,भ्रष्टाचार,बेरोजगारी,शिक्षण,आरोग्य हा काही एका जातीचा धर्माचा प्रश्न नाही. एका व्यक्तीचा नव्हे तर देशाचा प्रश्न हा आहे.त्यासाठी जन आंदोलन करणारे सर्वच मोदी सरकारच्या दुष्टिने आंदोलनजीवी झाले होते.त्यावेळी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाला कामगारांनी त्यांच्या राष्ट्रीय महासंघानी साथ दिली नाही.केंद्र सरकारच्या प्रत्येक जन आंदोलनात एकमेकांना मनापासून पाठीबा दिला नाही.शब्दीक पाठिबा दिल होता.त्याचे परिणाम आता सर्वच नागरिक भोगत आहेत.यापुढे सर्वधर्मसमभाव बोलतांना विचार करून बोलावे लागेल. आज भारतीय हिंदू मोदीच्या चरणी अर्पन झाला आहे.हा कमालीचा स्थितिशील असणारा,टिकून राहण्याचा लोकविलक्षण चिवटपणा,दाखविणारा आणि लोकसंख्येत ८५ टक्के असणारा हिंदुसमाज मनाने आधुनिक व गतिमान कसा करावा,हा आज स्वताला सेक्युलॅरिझम समजणाऱ्या लोकां समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे.हा दीर्घकाळ चालणारा खरा अटीतटीचा लढा आहे. एवढा चिवट असलेला हिंदुसमाज मनाने कमालीचा असहिष्णू व तितकाच कमालीचा क्रूर असूनही उदारमतवादी व सहिष्णू म्हणून ओळखला जातो. तोंडाने सर्वधर्मी समानता आणि आत्म्याचे अद्वैत सांगणाऱ्या या समाजाने दोन हजार वर्षे काही कोटी शूद्र,अति शूद्र आदिवासींना संस्कृतीच्या कक्षेच्या आत गुलाम करून टाकले होते.स्त्रियांची गुलामी हा पुन्हा वेगळाच भाग आहे. लक्षवेधी रुपये खर्चून मीनाक्षीसुंदरम आणि वेरूळची देवालये निर्माण करणाऱ्यांनी समाजात वरिष्ठ वर्गाच्या उपभोगासाठी दासी,बटकी आणि वेश्या मिळून जगातील सर्वात मोठा समूह निर्माण केला होता ! उदार हिंदूसंस्कृतीत इंग्रजांनी कायद्याने बंद करीपर्यंत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत माणसांच्या खरेदीविक्रीचे बाजार गुरांच्या आठवडी बाजाराप्रमाणे भरत होते.तसेच आता शहराच्या नाक्या नाक्यावर चौकात श्रम विकणारे बाजार भरत असतात.एकेक पुण्यश्लोक राजा केवळ धर्मप्रेमाखातर पाचपाचशे मुली देवळांना देवदासी म्हणून नजर करीत असे ! शत्रूंची बायका-मुले पकडून गुलाम करावी, ही प्रथाही भारतात होती.हिंदुसमाजात हे सर्व काही होते,याबद्दल मी हिंदुसमाजाला फार दोषी धरत नाही; कारण हेच चित्र मध्ययुगातील ख्रिश्चनांचे व मुसलमानांचे आहे.मी आपल्याच



धर्मातील मेंदूतील ब्लॅक (इश्रेलझ) काढण्याचा प्राथमिक प्रयत्न करीत आहे.तो या निमित्याने लिहून सांगण्याचा प्रयत्न करतो. असो... भारतात केवळ बाह्य स्वरुपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल,तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे.याच अर्थ हा की,क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे.याचा अर्थ कायदेभंग,असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता,त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते.परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गांचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारु तेवढे ते आपल्या हिताचे होईल.असे आत्मविश्वासाने बाबासाहेबांनी शेवटच्या भाषणात सांगितले होते. बाबासाहेब पुढे असे सांगतात दुसरी महत्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये.तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये,की जेणे करुन त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उदध्वस्त करण्यासाठी उपयोग करील. संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही.परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत.आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही. इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे,कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो, किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही,इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी, की केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल, तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही.सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय.

समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वभाविकरित्या अस्तित्वात राहणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णत: अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करुनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निष्कृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काही लोका जवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र,सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे,प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारत राहणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाही संरचना उदध्वस्त करतील.हे बाबासाहेबांचे शब्द आज देशात जसेचे तसेच अंमलात येताना दिसत आहेत. लोकशाहीने लोकांच्या मतदानाने लोकांसाठी लोकउपयोगी निर्णय घेण्याचे अधिकार बहाल केले.ते लोकप्रतिनिधी भांडवलदाराच्या रक्षणा करीता गोरगरीबाचा बळी देत आहे. म्हणजे लोकशाही ने दिलेल्या संविधाना नुसार नाही. तर हुकूमशाहीच्या मार्गाने चाललेले मार्गक्रम आहे. देशात म्हणजे आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्वाचे तत्त्व मान्य करणे होय. बंधुत्व म्हणजे काय?. जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करुन देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे. ती किती कठीण आहे, हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याच्या अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांगितलेल्या गोष्टीवरुन कळून येईल.ब्राईसच्याच शब्दात मी उद्धृत करु इच्छितो, ती घटना अशी- काही वर्षापूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रैवार्षिक अधिवेशनात सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करुन त्यात सर्व लोकांसाठी असेल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यू इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले, हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशीर्वाद दे. उत्स्फूर्तपणे ते त्या दिवशी मान्य करण्यात आले. या वाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला. धर्मोपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी 'राष्ट्र' या शब्दावर आक्षेप घेतले. त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्ट्राचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे तो शब्द गाळण्यात आला आणि हे प्रभो, संयुक्त राज्यांना आशीर्वाद दे. या शब्दांचा स्वीकार करण्यात आला. ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते. जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना 'भारतीय लोक' या शब्दाची चीड येत असे. भारतीय राष्ट्र म्हणणे ते पसंत करत असत. मी या मताचा आहे की आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल. हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल?.

सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल. त्यांनतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचा आम्ही गांभीर्याने विचार करु शकू. या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट त्या समाजजीवनात विभागणी करतात. त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती-जातीमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे. राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधुत्वा शिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल. स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे,कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इंग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले, तर त्यासाठी आपल्या शिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळ वेगाने बदलतो आहे. आपले लोकसुद्धा, नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत. लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येऊ लागला आहे. आता त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे. आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत, की जेणेकरुन लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील. यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बले ठरता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही.हे बाबासाहेबांनी संविधान सभेत शेवटचे भाषण आहे. सविधान दिनाचा हा २६ नोव्हेंबर १९४९ ते २६ नोव्हेंबर २०२३ ला ७४ वर्षाचा प्रवास भारतीय नागरिकांनी न वाचताच पार केला आहे.त्यामुळेच आज देशात अदुष्य युद्धाची परिस्थिती दिसत आहे.त्याला ८५ टक्के बहुजन समाज विशेष आंबेडकर विचाराला मानणारा समाज मोठ्या प्रमाणात दोषी आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही,बाबासाहेबांनी जे जे सावधानतेचे इशारे दिले होते त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करणारा समाज बाबासाहेबाचा कसा काय असू शकतो?.एक मराठा लाख मराठा,बहुजन पर्व,संविधान समर्थन,इतर बऱ्याच समाजाला माहित तरी आहे काय?. संविधान लिहण्याला किती वर्ष झाले?. ७४ वर्षात त्यांची किती अमंलबजावणी झाली?.म्हणुन भारतातील प्रत्येक नागरिकांनी संविधान वाचलेच पाहिजे.तरच तो गर्वाने सांगेल मी एक भारतीय आहे.तेव्हा तो मनुस्मृतीची आठवण करणार नाही.अधिकारी कर्मचारी आणि राजकीय नेतेच जर मनुस्मुर्ती समर्थक करणार नाहीत.

मंडल आयोग मजूर होताच राम रथ यात्रा निघाली आणि सर्व ओबीसी रथ यात्रेला निघाला होता.मराठा समाजाला एक डिसेंबरला आरक्षण मिळणार जल्लोष करण्याचे सांगितले जाते, तेव्हाच २५ नोव्हेंबर ला राम मंदिर दर्शनासाठी प्रोग्राम जाहीर होते आणि सर्व मराठा समाज अयोध्यात मोठ्या संख्येने सहभागी होतो.म्हणजेच न्यायप्रविष्ठ मुद्यावर मनुवाद्यांची उपदव्यमूल्य दाखवुन कायदा सुव्यवस्था मोडण्याचे काम सुरु होते.म्हणजे यांचा देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न सुरु आहे. जसे स्वातंत्र दिनाच्या पुर्वसंध्येला दहशतवादी काश्मिरात बॉम्बस्फोट घडवुन इशारा देतात तसेच हे मनुस्मृती मानणारे मनुवादी देशद्रोही बरोबर २६ नोव्हेंबर या संविधान दिनाच्या आधल्या दिवशीच राडा घालायचे ठरवीत असतात. मुळातच या मनुवाद्यांना समता, बंधुता, न्याय, मुलभुत अधिकार याबद्दल खुपच तिरस्कार असतो. मग त्याचेच प्रतिक असलेले दिवस निवडुन हे त्या दिवशीच दंगे घडवुन आणतात. म्हणुन तर ६ डिसेंबरलाच डॉ आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनीच बाबरी मशीद पाडली. आताही २६ जानेवारी च्या अगोदर २२ जानेवारीला राम मंदिरात प्राण प्रतिष्ठा भारतीय २६ जानेवारी,१९५० रोजी नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या भारत देशाने संविधान अंमलात आणून लोकशाहीतील एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. त्याच दिनालाच देशात अशांतता घडवुन आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. म्हणूनच मनुस्मृती आणि संविधान किती वर्षाचे झाले प्रश्न उभा राहतो. मनुस्मृती मानणारे संविधान दिन चिरायू व्हो असे म्हणणार नाहीत.मनुस्मृतीचा विजय असो असे म्हणण्याची धाडस ही करणार नाही.पण अधिकारी कर्मचारी आणि राजकीय नेतेच जर मनुस्मुर्ती समर्थककरून मराठा,मागासवर्गीय बहुजन समाजातील लोकांना मूर्ख बनविण्याचा व्यवस्थीत नियोजन करीत राहतील त्याला भारतीय जनता किती दिवस बळी पडतात हाच मोठा प्रश्न आहे.

**************

**आपला एक भारतीय नागरिक**
**सागर रामभाऊ तायडे,**
**भांडूप मुंबई -**
**९९२०४०३८५९,**

# 'डायलॉग'च्या विश्वात

कोणत्याही भाषेतील चित्रपटांमधील सादरीकरण, गाणी, ॲक्शन दृश्ये, कथानक, नायक-नायिका, खलनायक यांपेक्षाही त्यातील संवादांची चर्चा दीर्घकाळ होत राहते. त्यामुळे सिनेक्षेत्रातील कलाकारांना मिळणारा स्टारडम संवादलेखकाला मिळत नसला तरी चित्रपटांच्या यशातील त्याचा वाटा खूप मोठा असतो. अर्थात हे संवाद प्रभावीपणाने सादर करण्याचे श्रेय कलाकारांचे असते हे निश्चित. हिंदी सिनेसृष्टीत अनेक कलाकारांनी असे आशयघन संवाद तितक्याच प्रभावीपणाने सादर करून ते अजरामर बनवले आहेत. त्रपट-नाटक-मालिका यांच्या यशामध्ये कलाकारांचा अभिनय, नेपथ्य, सादरीकरण, कथानक, पटकथा यांबरोबरच संवादांचीही खूप मोठी भूमिका असते. किंबहुना, संवाद वगळता इतर सर्व बाबी जरी प्रभावी असल्या तरी ती कलाकृती लोकांच्या पसंतीस उतरण्याची शाश्वती नसते. याउलट अन्य बाबींमध्ये काही कमतरता असतील आणि संवाद व संवादफेक जर प्रभावी असतील तर असे चित्रपट चिरकाळ स्मरणात राहतात. यावरून सिनेमादी कलाकृतींमधील संवादांचे स्थान लक्षात येते. आपण सिनेरसिक असाल तर सहजगत्या आठवून पहा अनेक चित्रपटांमधील संवाद आपल्याला जसेच्या तसे तोंडपाठ असतात. वर्षामागून वर्षे सरत गेली तरी मन:पटलावर उमटलेला या संवादांचा ठसा अमीट राहतो. कृष्णधवल पडद्यापासून ते अलिकडच्या काळातील अनेक चित्रपटांतील संवाद आजही लोक विसरलेले नाहीत. समाजावर सिनेमाचा खूपच प्रभाव पडतो आणि त्याची प्रचिती आपल्याला वारंवार येते. याकडे काही चांगले तर काही वाईट परिणाम होण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. चित्रपटातील प्रत्येक संवाद, त्यातील भाषा याचे पडसाद समाजात उमटतातच. किंबहुना, एखादा शब्द, वाक्य प्रचलित करायचा असेल तर संबंधित चित्रपटातील संवादाचा वापर करून त्याची लोकप्रियता वाढवता येऊ शकते. असे अनेक संवाद असून ते केवळ चित्रपटांमुळेच आपल्या दैनंदिन जीवनात आले. वास्तविक जीवनात आपण सिनेमाच्या भाषेतून पात्राची व्यावहारिकता आणि दृश्यातून कथानकाचे आकलन करत असतो. चित्रपट पाहिल्यानंतर त्यातील संवाद जीवनाचा घटक बनून जातात आणि आपल्या बोलण्यातही वारंवार येतात. यावरून कथानक हा चित्रपटाचा आत्मा असतो, असे म्हणावे लागेल. कथानकाच्या माध्यमातून चित्रपटांत वैविध्यपणा येतो आणि तो चित्रपटात जीव ओततो. अशा कथानकाला दमदार आणि अचूक संवादाची जोड लागली तर तो चित्रपट आणि तो संवाद अनेक वर्षे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतो. चित्रपटातील संवाद जनमानसावर मोठा परिणाम करत असतात. एक काळ होता जेव्हा असे पल्लेदार संवाद त्या चित्रपटाचे सौंदर्यस्थळ मानले जायचे. 'ये पाँव जमीं पर मत रखिये' पासून 'जिनके घर शीशे के होते हैं' पर्यंत एक काळ राजकुमारच्या संवादांनी गाजवला. 'आनंद' मधल्या आनंदने बाबू मोशायला 'मृत्यूची महती' पटवून दिली ती अशाच अर्थपूर्ण संवादातून. कधी नायकाच्या तर कधी खलनायकाच्या तोंडी हे संवाद लोकप्रिय झाले.

# प्रतिगाम्यांना शिव्या देणे म्हणजे पुरोगामी नव्हे..

भारत आज वेगवेगळ्या समस्येतून जात आहे. एकीकडे देशातील लोकशाही व सोबतच लोकांचे हक्क अधिकार, शिक्षण, नोकरी, आरोग्य धोक्यात असुन देशातील प्रत्येक नागरिक कोणत्या ना कोणत्या समस्येंने ग्रस्त असुन मुळ समस्येची जाणीव होऊ नये म्हणून देव व धर्माचा आधार घेतला जात आहे. देशात वेगवेगळ्या विचार सरणीचे लोक आहेत. सत्ताधारी लोक व त्यांनी देव धर्म याच्या माध्यमातून निर्माण केलेले भक्त हे व्यवस्थेचा भाग आहेत तर या व्यवस्थेला विरोध करणारे आणि देव धर्म यापलीकडे माणुस व माणुसकी महत्वाची असून देश व देशातील जनतेचा सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे म्हणून व्यवस्थेला विरोध करणारे राजकीय व सामाजिक लोक. राजकीय लोक पुरोगामी व थोडेफार विचारवंत त्यांच्या सोईनुसार होतात, म्हणायला च ते पुरोगामी असतात परंतु आचरण हे प्रतिगामी लोकांचेच असते. म्हणजे एकीकडे संत व त्यांचे विचार सांगायचे आणि दुसरीकडे वैयक्तिक फायद्यासाठी त्यांच्या विचारा विरोधात वागायचे. असे पण काही पुरोगामी आहेत. पुरोगामी होणे म्हणजे सरळ सरळ व्यवस्थेला दोष देऊन शिव्या देणे एवढेच मर्यादित झाले आहे. व्यवस्थेसोबत हातमिळवणी करणाऱ्यांना भक्त म्हणून आपण व्यवस्थे विरोधात थोडफार बोलून पुरोगामी, वैचारिक किंवा महान कधीच होणार नाही. जात धर्म मंदिर हे आजच्या व्यवस्थेचे विषय आहेत. बऱ्याच लोकांना फक्त हे राजकीय विषय वाटतात परंतु राजकीय सत्ता हि विषमतावादी व्यवस्थेच्या कचाट्यात आहे हे ही मान्य करावे लागेल. व्यवस्थेचे भक्त मंदिराला समर्थन करत आहेत तर बाकीचे लोक मंदिराला नाही पण मंदिर उद्धाटन यावर चर्चा करून प्रत्येक जन राजकीय झोळी भरण्याची संधी बघत आहेत. परंतु आता सत्ता लोकांच्या मतातुन नाही तर इव्हिएमच्या माध्यमातून स्थापण होते हे ही विसरून चालणार नाही. सत्ताधारी व विरोधी दोघेही आपल्याला परिने मंदिराचे राजकारण करत आहेत. हि गोष्ट बारीक विचार केला तरच कळेल. राजकीय लोक आपल्याला फायद्यासाठी मंदिराचा वापर करून घेत आहेत मग स्वतःला आंबेडकरवादी समजणाऱ्या समुहाची यामध्ये काय भुमिका आहे? त्यांचा मंदिराला, मंदिराच्या उद्धाटनाला वा सरकार च्या ध्येयधोरणाला विरोध आहे? हे अजुनही स्पष्ट झाले नाही. कारण स्वतः ला आंबेडकरवादी समजणारे पुरोगामी लोक स्वतः च एक थोर विचारवंत, अभ्यासक आहेत म्हणुन प्रत्येकांचे मत वेगवेगळे येते. परंतु महत्त्वाचा मुद्दा हा आहे मंदिर बांधकाम सुरू झाले, पैसा खर्च होत आहे, मंदिरावर पुजाऱ्याचे, ट्रस्टीचे पोट तर राजकारण्यांचे वोट आहे. मग आज चर्चा फक्त मंदिरावरच केली तर काही निष्पन्न होणार आहे का? चर्चा अशा विषयावर व्हायला पाहिजे ज्यातून काही निष्पन्न होईल. परंतु मुळ मुद्दा हाच आहे की आम्ही महत्वाच्या मुद्यावर कधीच चर्चा करत नाही. बर एखादी घटना घडण्याआधी ही चर्चा होत नाही, घटना घडून गेली की दोन दिवस गरम गरम वक्तव्य करायचे तिसऱ्या दिवशी शांत बसायचे. यालाच काही लोक वैचारिक समजतात. म्हणून चुकीचे लोक सत्तेत जाऊन चुकिची व्यवस्था मजबूत करत आहेत. पण याकडे अभ्यासक, तज्ञ व वैचारिक लोकांचे लक्षच आहे की नाही हा प्रश्न आहे. कारण कोकीळेने जर गाणे बंद केले तर कावळ्यांचा कावकाव ही मधुर वाटतो. आणि आज तेच घडत आहे. आपण सत्य सांगण्यात कमी पडलो म्हणून असत्य पसरत आहे, विज्ञान सांगण्यात कमी पडलो म्हणून अज्ञान पसरत आहे, वास्तव सिद्ध करण्यात कमी पडलो म्हणून पाखंड थोतांड वाढले, संताचे वार समजला नाही म्हणून भोंदुबुवाचा उत आला. एखाद्या राजकीय नेत्याने राजकीय स्वार्थासाठी संविधानाचे किंवा बाबासाहेब आंबेडकर यांचे दाखले दिले तर त्यांना डोक्यावर घेतले जाते, परंतु रात्रंदिवस कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता जे लोक संविधान, बाबासाहेब व विज्ञान सांगतात त्यांना दूर्लक्षीत केले जाते.भक्तांना जागृत करणारे लोक स्वतः बद्दल च जागृत नाहीत याबद्दल खंत वाटते, जागृत म्हणजे फक्त भक्तांचे दोष दाखवने नव्हे तर स्वतः ची व्यवस्था निर्माण करणे होय. अंधविश्वास, थोतांड, बुवाबाजी ला विरोध करून भक्तांना झोपलेले समजणारे लोक लेण्या, कोरेगाव भिमा चा जयस्तंभ, समाजातील बेकीकरण याबाबत मात्र बोलणे सोईस्कर टाळतात. प्रतिगामी लोकांचे थोतांड, अंधविश्वास पाखंड बुवाबाजी जरी असली तरीही ते समाजात पेरणी करतात पुरोगामी लोकांकडे विज्ञान सत्य आणि संत असले तरी पेरणी होत नाही म्हणून जे पेरले तेच उगवणार हा सिद्धांत सोडून पुरोगामी कसे होता येईल.त्याचे खोटे जरी असले तरी खोट्याला खरं ठरवण्यासाठी त्यांच्या कडे शाळा कॉलेज मिडीया आहे स्वतः ला वैचारिक, पुरोगामी, अभ्यासक समजणारे, लाखों करोडोचे घरे बांधुन लाखोंच्या गाड्यात फिरणाऱ्यांनी स्वतः च्या शाळा कॉलेज मिडीया का उभा केला नाही. ज्यांनी शाळा कॉलेज व मिडीया उभा करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले त्यांना सहकार्य का केले नाही. स्वतः ला वैचारिक व पुरोगामी समजणाऱ्यांनी ही चुकीच्या लोकांना साथ देऊन प्रामाणिक लोकांचे वाटोळे केले. प्रतिगामी लोकांनी भक्त जरी निर्माण केले तरीही भक्ताच्या जोरावर त्यांची व्यवस्था टिकुनच नाही तर मजबूत करत आहेत, स्वतःला वैचारीक, अभ्यासक तज्ञ व राष्ट्रीय अध्यक्ष समजणाऱ्या लोकांनी वैचारिक फळी निर्माण करून चळवळीला किती हात भार लावला? आज देवा धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, भोंदुगीरी पाखंड जरी पसरवले जात असले तरीही लोक स्वतः खर्च करून तेथे जातात कारण तेथे भावना आहेत. परंतु वैचारिक आंबेडकरवादी लोकांच्या भावना कुठे आहेत संविधानात? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात? प्राचीन शिल्प व लेण्यात? कोरेगाव भिमाच्या जय स्तंभात? वरील पैकी कुठे आहेत भावना? आज संविधान धोक्यात आले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन त्यांचे विचार पायदळी तुडवले, बुद्धांच्या लेण्या, स्तुप यांचे दैविकरण सुरू असताना फक्त बघ्यांची भुमिका घेतली जात आहे, कोरेगाव भिमाचा जयस्तंभ चा खटला उच्च न्यायालयात सुरू आहे तरीही कोणाला काही घेणे देणे नाही. स्तंभ हा अतिक्रमाणाच्या विखळ्यात अडकलेला आहे, तो कधीही पडू शकतो, एवढी गंभीर गोष्ट ही वैचारिक, तज्ञ, अभ्यासक व राष्ट्रीय नेत्यांना कळू नये म्हणजे हे स्वतः किती जागृत असतील. जयस्तंभ अतिक्रमणात, लेण्या व बौद्ध मुर्तीचे दैविकरण हि खुप गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या साठी आर्थिक व एकीची खुप गरज आहे. आज जर लेण्यांचे दैविकरण आणि जयस्तंभाचे संवर्धन करायचे म्हणून आर्थिक आव्हान केले तर किती लोक आर्थिक सहकार्य करतील? भावना असल्यावर सहकार्य आपोआपच होते. म्हणून देवाधर्माचा विषय आला तर करोडो रुपये गोळा होतात पण आमच्या लेण्या स्तंभ संविधान यावर काम करताना घरदार संसार याकडे दुर्लक्ष करून भिक माघावे लागते तरीही कोणी भिकही घातल नाही हे पुरोगामीत्व आहे. बुद्धमूर्ती चे दैविकरण करून पुजले जात आहे या आशयाच्या रिल्स बनवल्या जातात, परंतु दैविकरणातून बुद्धाची मुर्ती बाहेर कशी काढायची यासाठी कीती लोक समोर येतात. आपल्या डोळ्यासमोर बुद्धभुषण प्रिंटिंग प्रेस जेथे डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वतः वर्तमानपत्र काढत होते ती नष्ट करून टाकली, दोन दिवस धिंगाणा झाला आता तर लोक विसरून ही गेले. याला आंबेडकरवादी म्हणायचे का? नाचगाणे मनोरंजन यासाठी शे पाचशे रुपये देऊन निरर्थक खर्च करणे यालाच काही महाभाग सामाजिक कार्य समजतात. प्रतिगामी लोक कामधंदा नोकरी करताना एकुण कमाई मधला काही भाग हा त्यांच्या सामाजिक कामासाठी काढून ठेवतात, नोकरी कामामधुन निवृत्त झाले तर पुर्णवेळ आंबेडकरवादी लोकांच्या भाषेत अंधविश्वास व पाखंड समाजात पसरवण्याचे काम करतात. आणि पुरोगामी लोक नोकरी करताना घर, गाडी, मुलांचे शिक्षण लग्न यामध्ये खर्च करतात काही लोकांची मुले चांगली सेटल झालेली असतात पण हे निवृत्त होतात. निवृत्त झाल्यावर घरात बसून लोकांना तत्वज्ञान सांगतात, बाहेर पडायचे वय झाले म्हणतात, आर्थिक मदत करायची तर मीच पेंशनर आहे म्हणतात, स्वतः चे पेंशन, मुलांचा पगार, असून ही समाजासाठी देण्याची मानसिकता नसलेले लोक ही स्वतःला मात्र पुरोगामी समजून स्वतःला आंबेडकरवादी समजतात. स्वतः कडे वेळ पैसा असूनही तो खर्च न करता केवळ मी वैचारिक आहे, मी निवृत्त आहे, मी सरकारी सेवेत आहे हे दाखवण्यासाठी अनेक लोक वैचारिक बनण्याचे सोंग करतात. सत्ताधारी व चुकीच्या लोकांना विरोध करण्याआधी आपण बरोबर वागायला पाहिजे. इतरांना फक्त शिव्या देऊन आपण आपले श्रेष्ठत्व वा मोठेपणा, वैचारिक पातळी विकसित करू शकत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले शिका संघटीत व्हा संघर्ष करा, आपल्या उत्पनातील विसावा भाग अर्थात पाच टक्के समाजाच्या कल्याणासाठी द्यावा. एवढे सर्व स्पष्ट लिहले असून, सर्वांना वाचता येत असुन एकत्र येऊन संघर्ष करत नसतील, आपल्या उत्पन्नातील पाच टक्के वाटा समाजाच्या कल्याणासाठी देत नसतील, वेळ देत नसतील तर अशा लोकांना विषमतावादी किंवा संविधान विरोधी व्यवस्था निर्माण करणाऱ्यांना फक्त शिव्या देऊन काय साध्य करायचे आहे. त्यांची व्यवस्था संविधान, हक्क अधिकार यांच्या विरोधात असली तरीही तेथे पैसा, वेळ, बुद्धी देणारे लोक खुप आहेत, स्वतः ची संपती, स्वतः ची जमवलेली सर्व रोख रक्कम ते लोक व्यवस्थेला दान देतात आणि विचार पेरतात. म्हणून त्यांच्या विचाराचे पिक उगवते. आपण पेरणी करत नाही, पेरणी करणाऱ्यांना मदत करत नाही आणि उगवलेल्या रोपांना दोष देऊन आपण महान होणार नाही. म्हणून आपल्याला पैसा वेळ बुद्धी देऊन संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, लेण्या, जयस्तंभ, यांचे संवर्धन करायचे आहे. त्यांच्या मंदिरावर आणि चुकिच्या वर्तनावर बोलण्या आधी आपली व्यवस्था, वैचारिक परिपक्वता, आणि संघटन आवश्यक आहे. फक्त शिव्या देऊन दोष देऊन होणार नाही तर प्रति व्यवस्था उभी करण्यासाठी प्रबोधन करणे आवश्यक आहे.

**********

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# लसीकरण धोरणात गालफुगीचा नाही समावेश

नागपूर : एकीकडे शून्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके व किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्य तपासणीसाठी 'जागरूक पालक, सुदृढ बालक' हे अभियान शासन राबवते. तर दुसरीकडे बाळांना भविष्यात 'गालफुगी' (गलगंड-मम्प्स)सारख्या आजारांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक लसीकरणाचा समावेश राष्ट्रीय लसीकरण धोरणात नसल्याची माहिती उघडकीस आली आहे.लसीकरण हा बालकांच्या संगोपनातील महत्त्वाचा घटक आहे. बालमृत्यू कमी करण्याचा सोपा मार्ग आहे. १ वर्षाच्या आतील बालकाचे प्राथमिक लसीकरण पूर्ण झाल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढते. बाळ जन्माला आल्यानंतर वेळेवर लसीकरण केले पाहिजे.यामुळे त्याचे अनेक आजारांपासून चे संरक्षण होऊ शकते. म्हणूनच लसीकरण ही बाळाची कवचकुंडले आहेत. असे म्हटले जाते. क्षयरोग प्रतिबंधक लस, त्रिगुणी लस, पोलिओ प्रतिबंधक डोस, गोवरची लस देण्यासाठी शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रापासून तर जिल्हा रुग्णालयात सोय आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातही हा लसीकरण कार्यक्रम राबवला जातो. झोपडपट्टीतील प्रत्येक नवजात शिशूला एकात्मिक बालविकास प्रकल्पाअंतर्गत





लसीकरण केले जाते. मात्र गालफुगी अर्थात 'मम्प्स' या आजारावरील प्रतिबंधक लस शासनाकडूनच मोफत मिळत नसल्याची माहिती पुढे आली आहे. लसीकरणाच्या धोरणात तफावत शासनाचे लसीकरण धोरण आणि इंडियन पेडियाट्रिक असोसिएशनच्या लसीकरण धोरणात काही प्रमाणात तफावत असल्याचे दिसत आहे. शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण धोरणात गालफुगीसारख्या आजारावर लस दिली जात नाही. मात्र खासगी बालरोग तज्ज्ञांची संघटना असलेल्या भारतीय बालरोग संस्थेच्या धोरणात गालफुगी नियंत्रणासाठी लसीकरण महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले आहे.गालफुगी नियंत्रणासाठी लसीकरण : डॉ. खळतकर अलीकडे महाराष्ट्र, तेलंगण आणि आंध्र प्रदेशामधील काही शहरांमध्ये गालफुगीची प्रकरणे वाढत आहेत. संक्रमित व्यक्तींना सामान्यतः जबड्याभोवती वेदना, सूज आणि कोमलता विकसित होते, जी एका बाजूला सुरू होते.हळूहळू दुसऱ्या बाजूला समाविष्ट होते. त्यांना सूज येण्याआधी ताप, डोकेदुखी, भूक न लागणे (एनोरेक्सिया), अस्वस्थता आणि मांसपेशी दुखणे (मायल्जिया )अशी लक्षणे दिसत आहेत. नागपुरातही अशी प्रकरणे पुढे आली आहेत.हा विषाणूजन्य संसर्ग असून जबड्याभोवती लाळ ग्रंथींना प्रभावित करतो. साधारणपणे जानेवारी ते मे दरम्यान दरवर्षी तुरळक प्रमाणात हा आजार दिसतो. दर चार-पाच वर्षांनी या साथीचा उद्रेक होतो. संक्रमित व्यक्तींच्या श्वसन स्रावांच्या जवळच्या संपर्कामुळे त्याचा प्रसार होतो. जबड्यावर सूज सुरू झाल्यानंतर दोन दिवस आधी ते ५ दिवसांनंतर रुग्ण इतरांना संसर्ग होण्याची भीती आहे. यामुळे मुलांना गालफुगीपासून दूर ठेवण्यासाठी लसीकरण करून घ्यावे, असे अध्यक्ष भारतीय बालरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. वसंत खळतकर म्हणाले.

# कोविडसारख्या घातक विषाणूचा उंदरांवर सुरू आहे प्रयोग; चीनमुळे आणखी एका महामारीचा धोका?

कोरोना विषाणू हा सर्वात आधी चीनच्या वुहान शहरामध्ये आढळून आला होता. चीनमध्येच याची निर्मिती झाली असावी असा आरोप जगभरातील कित्येक देशांनी आतापर्यंत केला आहे. तीन वर्षांपूर्वी जगभरात हाहाकार माजवणाऱ्या कोरोनाचा कहर लोक अजूनही विसरले नाहीत. सध्या कोरोनाच्या नव्या व्हेरियंटचे रुग्ण वाढत असतानाच, चीनमधून एक गंभीर बातमी समोर आली आहे. कोविडइतक्याच घातक अशा व्हायरसवर सध्या चीनमध्ये प्रयोग सुरू आहे. बायोरेक्टिव्ह वेबसाइटवर प्रसिद्ध झालेल्या एका रिसर्च पेपरमध्ये ही माहिती समोर आली आहे.चिनी सैन्यातील डॉक्टरांनी पँगोलिन कोरोना व्हायरस नावाचा एक कोविडचा व्हेरियंट तयार केला असल्याचा दावा या रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. डॉक्टरांची टीम ही या विषाणूचा प्रयोग उंदरांवर करत आहे. एबीपीने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. उंदरांवर भीषण परिणाम या डॉक्टरांनी काही उंदरांना या विषाणूचा डोस दिला. त्यानंतर त्यांना काही हेल्दी उंदरांसोबत एकाच पिंजऱ्यात ठेवलं. ७-८ दिवसांमध्येच निरोगी उंदरांनाही या नव्या विषाणूची लागण झाल्याचं डॉक्टरांना दिसून आलं. यानंतर पाचच दिवसांमध्ये सर्व उंदरांचं वजन अतिशय कमी झालं.. आणि अखेर डोळे पांढरे पडून त्यांचा मृत्यू झाला. उंदरांच्या आणि माणसांच्या शरीररचनेत मोठ्या प्रमाणात साम्य असतं. त्यामुळे कित्येक औषधांची पहिली चाचणी उंदरांवरच घेण्यात येते.

आता या विषाणूच्या चाचणीनंतर हे सिद्ध झालं आहे, की या विषाणूचा माणसांवर देखील गंभीर परिणाम होऊ शकतो.चीनमधून आला कोरोना?कोरोना विषाणू हा सर्वात आधी चीनच्या वुहान शहरामध्ये आढळून आला होता. चीनमध्येच याची निर्मिती झाली असावी असा आरोप जगभरातील कित्येक देशांनी आतापर्यंत केला आहे. अर्थात, याबाबत अद्याप ठोस पुरावे समोर आलेले नाहीत. मात्र, जगभरातील

# आतड्यांमधील जमलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ७ पदार्थ? बद्धकोष्ठतेचा त्रास पुन्हा होणार नाही!

बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी आहारात काही घटकांचा समावेश करणं आरोग्याला फायदेशीर ठरू शकतं. बद्धकोष्ठता किंवा ज्याला इंग्रजीत उेपीींळरिींळेप कॉन्स्टिपेशन म्हणतात, हे शब्द आपल्या कानावरून गेले नाहीत असं होणारच नाही. खाण्याच्या, झोपण्याच्या चुकीच्या सवयींमुळे अनेकांमध्ये बद्धकोष्ठतेचा त्रास वाढत आहे. या त्रासामुळे काही पदार्थांच्या सेवनाचा आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतो. बद्धकोष्ठता हा त्रास बहुतेक सर्व वयोगटातल्या लोकांना होताना दिसून येतो. आहारावर तुमचं आरोग्य अवलंबून असते. त्यामुळे उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहाराचा समावेश करणं आवश्यक आहे. बद्धकोष्ठतेचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी आहारात काही घटकांचा समावेश करणं आरोग्याला फायदेशीर ठरू शकतं, असे मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटलचे डॉ. प्रदीप राव यांनी सांगितलं असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.बद्धकोष्ठता म्हणजे शौचाला जाताना त्रास होणे. सकाळीच पोट स्वच्छ न झाल्यास, दिवसभर पोट फुगलेले राहाते आणि चिडचिडेपणा वाढतो. तसंच बद्धकोष्ठता समस्या दुर्लक्षित केल्यास, अनेक गंभीर आजार उद्भवू



शकतात. अन्नातून शरीराला ऊर्जा मिळते आणि अन्नातून पोषक तत्वे शोषून घेण्यात पचनसंस्था महत्त्वाची भूमिका बजावते. पचनक्रिया सुरळीत राहणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य पचनासाठी मोठ्या आतड्याचे निरोगी असणे आवश्यक आहे. शरीराचा हा अंतर्गत भाग स्वच्छ ठेवणे आणि रोगांपासून संरक्षण करणे खूप महत्वाचे आहे. पोटाचा असह्य गॅस आणि बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी कोणत्या पदार्थांचा आहारात समावेश करता येईल, जाणून घ्या..बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करतील खालील पदार्थ?१. अंजीर

अंजीर पाण्यात टाकून ठेवा. त्यानंतर ते खा. तसेच अंजीर दुधासोबतही खाऊ शकता. काही दिवस याचा वापर करा. तुमची बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होईल.२. चिया बिया चिया बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी सिड, अँटिऑक्सिडंट्स आणि मिनरल्स असतात, जे तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी काम करतात. सकाळी कोमट पाण्यात चिया बियांचे सेवन केल्याने पोट चांगल्या प्रकारे साफ होण्यास मदत होते.३. सफरचंद सफरचंद खाल्ल्याने पोटाशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत होते. सफरचंदात पेक्टिन असते, जे बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी आवश्यक फायबर असते. सफरचंद सालीसोबतच खावे, कारण त्यातदेखील फायबर असते.४. भिजलेले तुळशीचे बी तुळशीचे बीज खाल्ल्याने तुम्हाला बद्धकोष्ठतेपासून आराम मिळू शकतो. एक ते दोन मोठे चमचे तुळशीचे बी रात्रभर पाण्यात भिजवत ठेवावे. सकाळपर्यंत हे बी फुगतात. त्यानंतर तुळशी बियांचे हे पाणी प्यायल्याने आराम मिळू शकतो.५. पपई पई खाणे आरोग्यासाठी आणि पोटासाठी चांगले आहे. पपईने पोट साफ राहते. यात भरपूर व्हिटॅमिन डी आहे. म्हणून दररोज शिजवलेले पपई खा. ६. त्रिफळा चूर्ण आणि मनुका देशी तुपाशिवाय आयुर्वेदिक त्रिफळा चूर्ण, मनुका खाण्यानेदेखील बद्धकोष्ठतेपासून तुम्हाला सुटका मिळू शकते. मनुका खाल्ल्याने पचनक्रिया उत्तम होते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही. ७. हिरव्या भाज्या हिरव्या भाज्या आतड्यांना निरोगी ठेवण्याचे काम करतात. तसेच बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यास मदत करतात. म्हणून जास्तीत जास्त आहारात हिरव्या भाज्यांचा समावेश करा.सध्या अनेकांना थंडीच्या दिवसात पचनासंदर्भातील अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. बद्धकोष्ठतेची समस्या अधिक प्रमाणात त्रासदायक ठरत असल्याचे दिसून येत आहे. वेळेवर बद्धकोष्ठतेवर उपाय न केल्यास, अनेक गंभीर आजार होऊ शकतात. वरील सांगितलेल्या घरगुती उपायांचा उपयोग केल्यास नक्की यातून तुम्हाला सुटका मिळू शकते.

# चिकाटी व कठोर परिश्रमाद्वारेच यश प्राप्त होऊ शकते नूतन सहायक पोलीस आयुक्त निलेश गायकवाड

लातूर :- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ज्ञान संपादन आणि सातत्यपूर्ण अभ्यासाकडे आपले लक्ष केंद्रित केले आणि कठोर परिश्रम केले तर निर्धारित केलेल्या ध्येयापर्यंत पोहोचवून निश्चित यश प्राप्त होऊ शकते असे प्रतिपादन कोलकाता येथील नवनियुक्त सहायक पोलीस आयुक्त निलेश श्रीकांत गायकवाड यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बारावी बोर्ड परीक्षा संबंधी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते. विचार पिठावर माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. वनिता पाटील, प्रा. सुप्रिया बिराजदार, प्रा. नितीन वाणी, प्रा. श्रीनंद पाटील, प्रा. केशव सूर्यवंशी, प्रा. केशव बिराजदार, प्रा. श्रीकांत माळी आणि प्रा. माधुरी सरपे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना निलेश गायकवाड म्हणाले की, कोलकाता पोलीस आयुक्तालय हे १८५६ मध्ये स्थापन झालेले देशातील




सर्वात जुने पोलिस आयुक्तालय आहे. कोलकाता पोलिस प्रशासनामध्ये जवळपास ८५ पोलिस ठाण्यांचा समावेश असलेले ८ विभाग आहेत. कोलकाता पोलीस दलात सशस्त्र दलाच्या आठ बटालियन तसेच विशेष शाखा आहेत. अपारंपरिक गुन्हे, दहशतवाद आणि संबंधित क्रियाकलाप प्रभावीपणे हाताळण्यासाठी हे दल विविध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. त्यामधून मिळणारा अनुभव निश्चितच पुढील जीवनाच्या यशस्वीतेसाठी पूरक ठरणार आहे असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आयपीएस निलेश गायकवाड हे लातूरचे भूमिपुत्र असून नुकतेच ते कोलकाता येथे सहायक पोलीस आयुक्त म्हणून रुजू झाले आहेत. त्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्यावतीने आपण सन्मान करीत आहोत. यापूर्वी ते पश्चिम बंगाल येथील अलीपुरद्वार जिल्ह्याचे सहायक पोलीस अधीक्षक होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड आणि उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनीही मनोगत व्यक्त करून त्यांना पुढील कार्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. केशव सूर्यवंशी यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, सेयाद जलील, राम पाटील, बालाजी डावकरे, कृष्णा कोळी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. देवदत्त सावंत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय पुरस्कार २०२४ पुरस्काराने सन्मानित

लातूर :- राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील फिजिक्स या विषयाचे प्रा. देवदत्त सावंत यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय पुरस्कार २०२४ हा अत्यंत सन्मानाच्या व प्रतिष्ठेच्या पुरस्काराने राजर्षी शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे नुकताच मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. यावेळी कोल्हापुरी फेटा, सन्मान चिन्ह, सन्मानपत्र व ५००० रु.ची पुस्तके असे या पुरस्काराचे स्वरूप आहे यावेळी ज्येष्ठ लेखक व विचारवंत विश्वास सुतार, दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे, महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे माजी चेअरमन ॲड. विवेकानंद घाडगे, धम्मभवन चारिटेबल ट्रस्ट अध्यक्ष ॲड. करुणा विमल, संवाद प्रकाशनाच्या प्रमुख डॉ. शोभा चाळके, डॉ. श्रीपाद देसाई, विजया कांबळे, डॉ. नंदकुमार गोंधळी, ॲड. अकबर मकानदार, रूपाताई वायदंडे, प्रा. पुष्पलता सकटे, आचार्य अमित मेधावी, छाया पाटील, किशोर खोबरे, डॉ. अमर कांबळे, पांडुरंग अंबुलंगेकर आणि भाग्यश्री सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. देवदत्त सावंत फिजिक्स विषयाचे अध्यापनाचे




कार्य अत्यंत प्रभावीपणे करीत असतानाच युगपुरुषांच्या आणि महामानवांच्या विचार कार्याचा आदर्श घेऊन शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्यरत आहेत. बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट लातूर या धार्मिक क्षेत्रात कार्यरत न्यासाचेही ते सक्रिय सदस्य असून भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो व भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्माच्या प्रचार व प्रसाराच्या कार्याची ते अग्रेसर आहेत सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. राजकुमार बनसोडे, प्रा. प्रशांत लामतुरे, प्रा. संजय बिराजदार, प्रा. सुमंत देशपांडे, प्रा. उत्तम दोरवे, मनोज सूर्यवंशी, प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. पुरुषोत्तम साबळे आदींनी त्यांचे स्वागत केले आहे.

# सीईओ मॅडम दत्तक मांडवा गावात निकृष्ट आणि बोगस कामांचा धूमधडाका.! भ्रष्ट ग्रामसेवक समोर चौकशी अधिकारी ढवळे झाले सलेंडर .!

किनवट / .ता.प्र.शेख शौकत :- आदिवासीं बहुल तालुका असलेल्या किनवट तालुक्यात सर्वात गब्बर आणि मालदार ग्रामपंचायत पैकी एक ग्रामपंचायत असणारी मांडवा ग्रामपंचायत ही आमदार केराम यांचा मर्जीतील खास ग्रामपंचायत आणि कोणत्याही निवडणुकीचा प्रचाराचा नारळ त्यांनी याचं मांडवा गावात फोडत प्रचार सुरू केला आहे.त्यामुळे त्यांचे खास लक्ष्य या ग्रामपंचायत मधे आहे.त्यांनी विकासाचा निधी कधीचं कमी पडू दिला नाही.आणि म्हणूनच जिल्हा परिषदेचा सीईओ मॅडम यांनी मांडवा गावचं दत्तक घेतले आहे आणि त्यांनी वेळोवेळी विकास निधी मंजूर केला आहे. पणं म्हणतात ना दैव देते आणि कर्म नेते या म्हणीला सार्थ ठरविण्यासाठी इथल्या गुत्तेदार जे की खुद्द गावातील नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी सदस्य आहेत यांनी विविध प्रकारच्या विकास निधिवर्ती निकृष्ट दर्जाची आणि बोगस कामावर जोरदेत आमदार आणि सीईओ मॅडम यांचा विश्वासाला तडा देत निधीची विल्हेवाट लावली जात आहे. माणसाचा मरणा नंतर त्याचा शेवटचा प्रवास तरी सुखाचा व्हावा अशी अपेक्षा असते परंतु या गुत्तेदारने स्मशान भूमी साठी करण्यात आलेल्या रस्तावर जुन्या सिमेंट रस्त्याचे वेस्ट मटेरियल वापरत रस्ता केला आहे तर गावात अंगणवाडी जवळ करण्यात आलेल्या रस्तावर खाली मोठं मोठे दगड टाकत रस्ता अंदाजपत्रक प्रमाणे न बनवता त्याची पूर्णतः आपल्याच मर्जीने काम करत रस्ता बनवला आहे. गावातीलच असणाऱ्या सदस्य गुत्तेदार आणि उपसरपंच यांना




या बाबत भेटून विचारणा केली असता त्यांनी आमचं गाव दत्तक गाव आहे आम्ही कितीही खराब काम केले आणि काम न करताच बिले उचलली तरी आमचं कोणी काहीही करू शकत नाही आमचा वर सीईओ मॅडम यांचा वरदहस्त आहे. कामाचा दर्जा बाबत अभियंता यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की काम अंदाजपत्रक प्रमाणे करण्यास सांगितले होते जर काम अंदाजपत्रक प्रमाणे करण्यात आले नसेल तर पूर्ण काम गुत्तेदार कडून पुन्हा करून घेण्यात येईल आणि जो पर्यंत काम अंदाजपत्रक प्रमाणे होणारं नाही तो पर्यंत कोणतीही मोजमाप पुस्तिका लिहिण्यात येणारं नाही. आणि कोणतीही देयके अदा करण्यात येणार नाहीत. बोगस आणि निकृष्ट दर्जाची कामे करण्याची चढाओढ तालुक्यातील विविध ग्रामपंचायती मधे लागलेली आहे. तक्रार धारक पुराव्या निशी तक्रार करतात परंतु चौकशी अधिकारी असणारे विस्तार अधिकारी ढवळे साहेब यांच्याकडे पाठपुरावा करूनही चौकशी केली जात नाही आणि चुकून त्यांना जिल्हा परिषद मधील कामातून वेळ मिळालाचं तर चौकशीचा नावावर चालढकल करत भ्रष्ट ग्रामसेवकांना चार चार वेळा अभिलेखे तयार करण्यासाठी वेळ देत चौकशीची हवाच काढून टाकताना त्यांचा एकंदर कारभार दिसला आहे.गोकुंदा ग्रामपंचायत मधे झालेल्या १ कोटी ४० लाखांचा भ्रष्टाचाराची चौकशी असो की घोटी ग्रामपंचायत मधे बोगस दलित वस्ती सुधार योजना कामाची चौकशी असो की अगदी घोटी ग्रामपंचायत मधील पूर्णतः आदिवासी वस्ती असलेल्या नवाखेडा गट ग्रामपंचायत मधील सर्वच आदिवासी नागरिकांनी पेसा कामातील भ्रष्टाचाराची केलेली तक्रारची चौकशी असो एकही चौकशी आज पर्यंत चौकशी अधिकारी ढवळे साहेबांनी वेळीच पुर्ण करत भ्रष्ट ग्रामसेवकाची उचलबांगडी केली असेल असे एकही उदाहरण नाही.भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यात त्यांचा कोणता स्वार्थ आहे हे न उलगडणारे कोडे आहे.? तर अशी ही एकंदर परिस्थिती बघता किनवट पंचायत समितीच्या पारदर्शक कारभारासाठी सीईओ मॅडम स्वतः लक्ष्य देतील का हे बघण्यासारखे राहिलं.

# उल्हासनगर येथील पाणी पुरवठा योजनेचा शुभारंभ मोदींच्या हस्ते ऑन लाईन उद्घाटन

उल्हासनगर / प्रतिनिधी : भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या अमृत २.० अंतर्गत उल्हासनगर शहरातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामाला सुरवात झाली असुन या योजनेचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले आहे. उल्हासनगर महापालिकेने भारत सरकार व राज्य सरकार यांच्या अंतर्गत २ .० शहरातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामाचा शुभारंभ झाला आहे. या योजनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपन्न झाले आहे. या योजनेच्या कामाची एकुण किंमत १२६ कोटी ५८ लाख रुपये असून सदर प्रकल्पात एकूण ४ जलकुंभ उभारण्यात येत आहेत. तर ११४ किलोमीटर जलवाहिनी अंथरण्याचेही काम या योजनेच्या माध्यमातुन होणार आहे. तर या योजनेतुन शहरातील एकूण १ लाख ५८ हजार नळ जोडणी धारक लाभार्थी असणार आहेत. दरम्यान या योजनेच्या कामासाठी इगल इंफ्रास्ट्रक्चर या कंपनीला ठेका दिला आहे. या कंपनीने शहरातील सर्व प्रमुख रस्ते खोदुन ठेवले आहे. या पुर्वी सुध्दा कोणार्क कंपनीला शहरातील पाणी योजनेसाठी करोडो रुपयाचा ठेका दिला होता . या कंपनी कडे या योजनेचा कोणता ही नकाशा नसल्याचे समजते. सोबतच या कंपनीने जलवाहीनी टाकन्याचे काम अर्धवट केल्याचे दिसुन येते.

# पी. डी. कारखानिस महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

उल्हासनगर / प्रतिनिधी : पी. डी. कारखानिस महाविद्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असुन या शिबिरात शिक्षक विद्यार्थी यांनी रक्तदान करुन आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभाग एन एन एस व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग डी एल एल ई या दोन्ही विभागाच्या संयुक्त विद्यमाने व उल्हासनगर येथील सेंट्रल हॉस्पिटल येथील रक्त संक्रमण केंद्र रक्तपेढी यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर संपन्न झाले आहे. पी डी कारखानीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदिपान नवगिरे यांच्या प्रयत्नाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.या शिबीरात सेंट्रल हॉस्पिटलचे रक्त संक्रमण विभागाचे अधिकारी श्री. डॉ. विलास वाघमारे, बागडे सर, शिंदे मॅडम या सेंट्रल हॉस्पिटलच्या टिम ने महाविद्यालयातील रक्तदान शिबीरात महत्वपूर्ण कामगिरी केली . यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक वर्ग, बदलापूर येथील नगर परिषदेचे शिक्षक व मुख्याध्यापक, उल्हासनगर मधील विद्यार्थ्यांचे पालक, लादी नाका येथील रक्तदाते, भाऊसाहेब परांजपे येथील रक्तदाते, तसेच द एज्युकेशन सोसायटी चे पदाधिकारी श्री दिलीप साठे, श्री. दिलीप कणसे, श्री विशे तसेच गुरुकुल शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वर्ग यांनी या रक्तदान शिबिराला भेट दिली. तर यावेळी एकूण ३३ रक्त पिशव्या रक्तदानाच्या रूपाने प्राप्त झाल्या आहेत. दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यामधील सर्व विद्यार्थी वर्ग यांनी विविध समित्या द्वारे आपले रक्तदाना संदर्भातील काम करून महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य संदिपान नवगिरे व महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.आनंद दांडगे व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग याचे संयोजक प्रा. अनिल बोराडे यांनी रक्तदान आयोजन करण्याबाबत महत्वपूर्ण कामगिरी पार पाडली.

# लातूरचा बिहार होऊ देऊ नका - पालकमंत्री साहेब उंटावर बसून शेळ्या राखणं तुम्ही पण बंद करा - अक्षय धावारे

लातूर :- गिरीश महाजन साहेब आपली लातूरचे पालकमंत्री म्हणून निवड झाली त्यावेळी पालकमंत्री म्हणून तुम्ही तुमचं कोणते कर्तव्य पार पाडले यावर पण थोडच बोला या आठ नऊ महिन्यांमध्ये एकदाही तुम्हाला वाटलं नाही लातूर च्या लोकांचे प्रश्न ऐकावेत आणि तो सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत किंवा लातूर च्या लोकांनी प्रश्न कुणाकडे मांडायचा याचे तुम्ही काही नियोजन सुध्दा केले नाही म्हणजे अपना काम बनता भाड में जाए जनता ही डायलॉग तुम्हाला बरोबर बसतीय बघा आता तुम्हाला लातूरचा पत्ता माहिती नाही पण तिकडचं राहून लातूरचे दोन नंबर धंदे मात्र तुम्हाला दिसले



लातूर चा बिहार होऊ देऊ नका म्हणून सांगताय लातूर चे पोलीस प्रशासन अन्न भेसळ अधिकारी झोपलेत का जागोजागी दारू गांजा खुलेआम मटका जुगार गुटखा विक्री होत आहे आता तर कहरच झालीय लातूरमध्ये गुन्हेगारी सुध्दा वाढत चालली आहे दोन चार दिवसाला कुणाचा तरी खुन झाल्याची बातमी कानावर पडल्याशिवाय राहत नाही पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जागोजागी दोन नंबर धंद्यावर धाडी टाकून ते उध्वस्त केले गुन्हे दाखल झाले तरी सुध्दा लातूरमध्ये खुलेआमपणे जोरात दोन नंबर धंदे चालू आहेत चार पैशावर विकणारे दलाल हफ्ते खोर अधिकाऱ्यांमुळे सर्वसामान्य लोकांना नाहक त्रास सहन करावा लागतो या दोन नंबर धंदे अवैध धंदे करणाऱ्यांना पाठबळ कोणाचं आहे याची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करा हे असं होऊ नये मी करतो मारल्यासारखे तु कर रडल्यासारखे तुम्ही पालकमंत्री म्हणून जरी याकडे लक्ष घातले असले तरी सर्वसामान्य नागरिक म्हणून लोकांचे लक्ष तुमच्याकडे आहे हे विसरू नका...

# आगवे गावातील विकास कामांची भूमीपुजन आ. शेखर निकम यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न

चिपळूण/ प्रतिनीधी: चिपळूण तालुक्यातील आगवे गावातील विकास कामांच्या भूमीपुजन कार्यक्रमासाठी आमदार शेखर निकम सर यांची उपस्थिती लाभली व मोठ्या उत्सहात बहुसंख्य ग्रामस्थांच्या उपस्थितीत भूमीपुजने संपन्न झाली. यावेळी ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांचा सत्कार करुन त्यांचे मन:पुर्वक आभार मानले.

आमदार शेखर निकम यांनी विविध योजनेतून मंजूर केलेली कामे मौजे आगवे हुमणेवाडी येथे नविन अंगणवाडी इमारत बांधणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (डोंगरी विकास कार्यक्रम योजना सन ) - ५ लाख, मौजे आगवे हुमणेवाडी रस्ता डांबरिकरण करणे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी. - (२५/१५ योजना सन) - ५ लाख, मौजे आगवे हुमणेवाडी रस्ता डांबरीकरण करणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (आमदार स्थानिक विकास कर्यक्रम ) - ३ लाख, मौजे आगवे बौद्धवाडी राणीमवाडी हुमणेवाडी शाखेसह रस्ता सा. क्र. ०/६०० ते २/०० (ग्रामा ८८), ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (३०/५४ 'गट' ब योजना ) - १० लाख, मौजे आगवे बौद्धवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी. - (आमदार स्थानिक विकास कर्यक्रम ) - ५ लाख, मौजे आगवे बौद्धवाडी रस्ता राणीमवाडी हुमणेवाडी शाखेसह रस्ता सा.क्र. १/०० ते ५/०० ग्रामा ८८, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (३०५४ गट-ब व गट-क योजना ) - १० लाख, मौजे आगवे मधलीवाडी ते कापशीचा माळ रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (कोयना भुकंप सन ) - ५ लाख, मौजे आगवे हुमणेवाडी येथे साकव बांधणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (जिवायो ग्रामिण साकव कार्यक्रम सन ) - २५ लाख, मौजे आगवे बौद्धवाडी अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास सन ) - ८ लाख, आगवे बौद्धवाडी रस्ता राणीमवाडी हुमणेवाडी शाखेसह रस्ता ग्रामा ८८ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, ता. चिपळूण. - (जिवायो ग्रामिण रस्ते विकास सन ) - १० लाख, आगवे बौद्धवाडी राणीवाडी हुमणेवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. - (बजेट सन २०२३-२०२४) - ३० लाख यापैकी कामपूर्ण झाले आहेत तसेच उर्वरीत कामाचे भूमिपूजन संपन्न झाले आमदार शेखर निकम यांनी मनोगत व्यक्त करताना आगवे



गावाबाबत म्हणाले की, आगवे हे माझे गाव असुन, स्वर्गीय गोविंदराव निकम साहेब यांच्या राजकीय कारकिर्दी पासुन ते अगदी मी आमदार झालो आणि अजूनही अगदी विश्वसनीय साथ लाभली आहे. या गावाशी माझं कौटुंबिक नातं अगदी पुर्वी पासून आहे हे आपण जाणता. आपण सांगितलेले विकास कामे तसेच अडचणीच्या काळात आपणाला लागणारे सहकार्य कधी होणार नाही अस कधीच होणार नाही. आपण ग्रामस्थांनी मला केव्हाची अडचणीच्या काळी हाक मारा मी सदैव तुमच्या सोबत असेन. आपण सांगितलेली बरीचशी विकास कामे मार्गी लावली आहेत आणि जी राहीली आहेत ती पुढील काळात नक्कीच पुर्ण करीन असे मी सर्व ग्रामस्थांस विश्वास देतो.

यावेळी चिपळूण तालुकाध्यक्ष अबु ठसाळे, माजी सरपंच खेर्डी दशरथ दाभोळकर, जयंत घडशी (सरपंच), मिनल जाधव (उपसरपंच), अनिकेत भंडारी (सदस्य), निलेश हुमणे (सदस्य), राजकुमार गावणंग (सदस्य), सोनाली चव्हाण (माजी सरपंच), प्रशाली राणीम (सदस्य), वैष्णवी निर्मळ (सदस्य), भागवत (ग्रामसेवक), मारुती हुमणे (तंटामुक्ती अध्यक्ष), बाबासाहेब भुवड, श्रीराम हुमणे, जयराम हुमणे, विठ्ठल हुमणे, बंडू भुवड, मुंकुद भुवड, भाई गावणंग, संतोष खांबे, राजेंद्र हुमणे, संदेश जाधव, मारुती राणीम, शांताराम जाधव, ठेकेदार प्रथमेश निकम व पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE